या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार १ मे २०२४ | अंक१४२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# सरपंच हा गावचा मुख्यमंत्री - बजरंगबप्पा

## भाऊ सबुरीने घ्या , माझा विजय तुम्हीच करणार



मागील पंधरा दिवसापासून मी पालकमंत्र्यांना जरा सबुरीने घ्या असा सल्ला देतोय पण ते काही ऐकत नाहीत ते रोज आपल्या बहिणीच्या अडचणी वाढवणारी वक्तव्य करत आहेत एकूणच त्यांची सगळी धावपळ बहिणीचा पराभव करण्यासाठीच आहे कि काय असा प्रश्न प्रकर्षाने जाणवू लागला असल्याचे मत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी आष्टी तालुक्यातील आपल्या प्रचार सभेदरम्यान व्यक्त केले " लोक ऐकत नाहीत " अस म्हणणाऱ्या सरपंचानी लोकप्रतिनिधींच्या दारात जाऊ नये असे वादग्रस्त वक्तव्य पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केल्यानंतर या वक्तव्यावरून त्यांच्यावर टीकेची झोड उठली असून सरपंच संघटनाही यावरून आक्रमक झाल्याचे दिसत आहेत आता त्यांच्या याच वक्तव्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनीही त्यांना घेरले आहे सोनवणे यावर बोलताना म्हणाले कि ; निवडणुकीत टोकाची व व्यक्तिगत टीका होणार नाही याची दक्षता घ्या थोड सबुरीने घ्या असा मैत्रीचा सल्ला आपण पालकमंत्र्यांना दिला पण ते काहीकेल्या थांबताना दिसत नाहीत रोज नवनवीन आरोप करत आहेत त्यात ते स्वतःचा नाकर्तेपणा देखील अधोरेखित करत आहेत हेच काय कमी होते कि काय त्यात त्यांनी कालच्या सरपंचाच्या बाबतीत वक्तव्य करून बहिणीच्या अडचणी वाढवण्याचेच काम करत आहेत त्यामुळे त्यांना आपल्या बहिणीला पडण्याची घाई झाली आहे कि काय असे वाटू लागले आहे . त्यांचा पराभव हि जनता करणारच आहे त्यासाठी चार जूनची वाट तरी बघा असा टोमणा देखील मारला आहे ........................

### सर्व समुदायांना भाजपने फसवले

या जातीकडे बोट दाखवून त्या जातीचे मते घ्यायची हि तर भाजपची जुनी रीत आहे , मुस्लिमांना टार्गेट करून हिंदूंची मते घ्यायची हा वरचा फंडा खाली आणून आता जातीपातीचे राजकारण भाजपने सुरु केले आहे .ओबीसी सोबत डीएनए जुळवणारी भाजप ओबीसीचे आरक्षण काढून घेण्याची भाषा अमित शहाच्या तोंडातून करते यावर काय उत्तर देणार आहे , ओबीसी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रद्द केली , माता सावित्राआई व ज्योतीबांच्या बद्दल असवेदनशील वक्तव्य करणारे माणसे भाजपने राज्यपाल म्हणून महाराष्ट्रात आणली , मराठा समाजाच्या आंदोलनाला फसवले अधिसूचनाच अध्यादेश भासवला , धनगर बांधवांचे आरक्षण कोर्टात टिकले नाही कारण सरकारने युक्तिवाद कमकुवत केला ,प्रत्येक समुदायाला केवळ भूलथापा देऊन जातीचे मते लाटण्याचे राजकारण आता जनता ओळखून बसली आहे त्यामुळे यावेळी जनता भाजपला जागा दाखवेल असे सोनवणे यांनी प्रचार करताना म्हटले .

# निवडणूक निरीक्षकांनी स्ट्रॉंग रुम आणि मतमोजणी ठिकाणाची केली पाहणी

**पाटोदा | प्रतिनिधी**

बीड, दि.30: निवडणूक निरीक्षक अजीमूल हक यांनी मंगळवारी रात्री शासकीय तंत्रविद्या निकेतन (गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक) येथे निवडणुकीनंतर ठेवण्यात येणाऱ्या बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅट मशीन्स ची तसेच 4 जून रोजी होणाऱ्या मतमोजणी निमित्त केलेल्या तयारीची पाहणी केली. शासकीय तंत्रविद्या निकेतन येथे निवडणुकीनंतर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदार संघातील मतदान मशीन ठेवण्यात येणार असल्याने येथे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून काम होत आहे. या कामाचा आढावा यावेळी श्री हक यांनी घेतला. सीसीटीव्ही, कॅमेरा कंट्रोल रूम, मीडिया सेल, मतमोजणीची ठिकाण, मतमोजणी झाल्यावर राजकीय पक्षांना तसेच माध्यमांना देण्यात येणारी माहिती चे केलेले नियोजनाची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. या ठिकाणी असणाऱ्या मूलभूत सुविधा याबाबत संबंधित यंत्रणेला विचारणा केली. पुढील पाहणी 7 मे ला करण्यात येणार असून त्यापूर्वी सर्व कामे व्हावीत, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. यासह त्यांनी वखार महामंडळातील गोदामात ठेवलेल्या मतदान मशीनची सीसीटीव्ही च्या माध्यमातून पहाणी केली. तसेच या परिसराचा दौरा केला.




# महाराष्ट्र दिनाच्यानिमित्त आज ध्वजारोहण



बीड, दि. 30 : महाराष्ट्र दिनाच्या 65 व्या वर्धापन दिनानिमित्त आज (बुधवार) पोलीस मुख्यालयाच्या ठिकाणी सकाळी 8 वाजता राज्याचे कृषी मंत्री तथा जिल्हयाचे पालक मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या ठिकाणी ध्वजारोहण करणार आहेत.

यासह जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी 7.15 वाजता होणार आहे. तसेच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील ध्वजारोहणाचा कार्यक्रम अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांच्या हस्ते सकाळी 7.00 वाजता संपन्न होणार आहे.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना मंत्रालयात अभिवादन

मुंबई, दि. 30: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज मंत्रालयात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव रवींद्र पेटकर यांनी यावेळी पुष्पहार अर्पण केला. कक्ष अधिकारी घनश्याम जाधव, सहायक कक्ष अधिकारी रवींद्र बच्छाव, नितीन राणे आदींसह मंत्रालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# ज्यांनी आरक्षणासाठी खस्ता खाल्ल्या त्यांच्या पाठीमागे उभा रहा - राजेंद्र होके यांचे प्रतिपादन

**बीड प्रतिनिधी**

माजलगाव : आज मराठा आरक्षणाच्या तापलेल्या तव्यावर अनेकांना आपली राजकीय पोळी भाजून घ्यायची आहे. परंतु मराठा समाजाच्या तरुणांनी कोणाच्याही मागे वाहवत न जाता ज्यांनी मराठा आरक्षण प्रश्नासाठी खस्ता खाल्या, आपलं आयुष्य पणाला लावलं, जेल भोगलं, आपलं कुटूंब वाऱ्यावर सोडून सहा सहा महिने फरार राहावं लागलं त्याचं योगदान लक्षात घेऊनच मतदान करावं. हाच राजेंद्र होके आरक्षण प्रश्नासाठी रस्त्यावर होता. हाच राजेंद्र होके तुम्ही आवाज दिला तर लगेच धावत येईल, त्यामुळे आपलं मतदान माझ्या दुरदर्शन अर्थात टीव्हीला या चिन्हाला द्या, अशी कळकळीची विनंती अपक्ष उमेदवार राजेंद्र होके पाटील यांनी केली आहे. गावागावात आयोजित कॉर्नर बैठकीत युवकांशी संवाद साधताना होके पाटील बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, मराठा समाजाला आरक्षणापासून वंचित ठेवण्याचं खरं पाप काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने केले आहे. मराठा समाज हा कुणबी असताना देखील इतके वर्ष त्यांनी हे लपवून ठेवत मराठा समाजाला ओबीसीच्या लाभापासून वंचित ठेवले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आम्हाला कुणबी म्हणवून घेण्यासाठी मदत केली परंतु त्यासाठी आंतरवाली सराटीत आमच्या आया बहीणींला लाठ्या काठ्या खाव्या लागल्या. आमची मागणी सगे सोयरेंची असताना तुम्ही 10 टक्क्याचा 50 टक्क्यांच्या वरतून कोटा देता, त्यामुळे या सरकारने देखील आमची फसवणूक केली. वरतून आमच्या मागे एसआयटी लावली. मराठा समाज हे कदापि विसरणार नाही. पण आज शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे लोक जणू मराठा आरक्षण आंदोलनात ह्यांनी स्वतःला झोकून दिलं याप्रमाणे मराठा समाजाला मतं मागत आहेत. त्यांची मतं ग्राह्य धरली जात आहेत. मराठा समाज म्हणजे शरद पवार यांच्या पक्षाची मक्तेदारी नाही. समाजाच्या तरुणांची माथी भडकावून त्यांना जर कोणी आमचा पक्षच तुमचा तारणहार असे सांगत असेल तर अशा लोकांपासून मराठा समाजाने त्यांच्यापासून चार हात दूर रहावे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने केवळ आणि केवळ कारखानदार, संस्थाचालकांचे हित बघीतले. सामान्य मराठा समाजाला शिक्षण, नोकरी यापासून वंचित ठेवण्याचं पाप केलं आहे. त्यामुळे समाजाने त्यांच्या नादी लागू नये.



संपादकीय

## भारतीय कलेच्या इतिहासात कायम

(भालजी पेंढारकर जयंती विशेष.)

भालचंद्र पेंढारकर अर्थात अण्णा हे अत्यंत व्यासंगी, शिस्तबद्ध आणि रंगभूमीवर अमाप श्रद्धा असणारे रंगकर्मी होते. तिसरी घंटा जाहीर केलेल्या वेळेवरच देणारे आणि त्याच क्षणी बुकिंगची पर्वा न करता नाटक सुरू करणारे एकमेव निर्माता आणि अभिनेते होते. मुंबई साहित्य संघात त्यांची स्वतःची रेकॉर्डिंग रूम होती. त्यात त्यांनी असंख्य नाटके रेकॉर्ड करून ठेवलेली आहेत.. त्यांत प्रायोगिक नाटके, संघात झालेल्या प्रत्येक नवीन प्रयोगाचे ध्वनिमुद्रण त्यांनी केले होते. अधिक रोचक, उपयोगी संकलित माहिती श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर लेखात वाचा.... संपादक.

भालजी पेंढारकर हे भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया घालणाऱ्या चित्रकर्मींमधले अग्रणी चित्रपट दिग्दर्शक, निर्माते, पटकथालेखक, संवादलेखक आणि गीतकार होते. भालजींचा जन्म दि.२ मे १८९८ रोजी कोल्हापूर संस्थानचे तत्कालीन सहायक शल्यचिकित्सक डॉ.गोपाळराव आणि राधाबाई पेंढारकर यांच्यापोटी कोल्हापुरात झाला. निर्माते-अभिनेते बाबूराव पेंढारकर हे त्यांचे ज्येष्ठ बंधू. चाकोरीबद्ध शालेय शिक्षणात मन न रमलेल्या भालजींनी तरुणवयातच कोल्हापूर सोडले. सुरुवातीच्या काळात पुण्यात केसरी या वृत्तपत्रात नोकरी, छत्रपती शाहूमहाराजांच्या रायबाग कॅम्पमध्ये वास्तव्य आणि सैन्यात भरती काहीशी अशी भटकंती करत ते कोल्हापूरला परतले. भालजी पुण्यात असताना त्यांनी केसरीचे अंक घरोघरी पोहोचवणे, विकणे अशी कामे केली; पण त्यातून उरलेल्या वेळात त्यांनी केसरीचे जुने अंक-विशेषतः लोकमान्य टिळकांचे जहाल अग्रलेख, चिपळूणकर, मोडक, विजापूरकरांच्या ग्रंथमाला, पुस्तके, चरित्रे असे साहित्य वाचले. त्यांच्यातल्या लेखकावर या सगळ्यांचे संस्कार झाले. पुण्यातल्या लक्ष्मी थिएटरचे व्यवस्थापक रुस्तमजी मोदी (सोहराब मोदींचे बंधू) यांनी त्या काळी मूकपटांच्या वरच्या भागात इंग्रजी उपशीर्षकांची मराठी भाषांतरे देण्याची पद्धत सुरू केली होती. भालजींना वर्तमानपत्रात स्फुटे लिहिण्याबरोबरच हे मराठी भाषांतराचे कामही मिळाले. पुढे त्यांनी सिनेमा समाचारमधून चित्रपटांची परीक्षणेही लिहिली. १९२१ मध्ये भालजींनी संगीत कायदेभंग, भवितव्यता, क्रांतिकारक, राष्ट्रसंसार, आसुरी लालसा आणि अजिंक्यतारा ही सहा नाटके लिहिली, त्यांत अभिनयही केला.

भारताला स्वातंत्र्य मिळाले होते. गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त झाल्याच्या भावनेचा व स्वातंत्र्याचा दिव्य संदेश भालजींनी आपल्या चित्रपटांतून दिला. बहिर्जी नाईक, नेताजी पालकर, मोहित्यांची मंजुळा यांतील संवादांमधून भालजींनी दुबळेपणा व लाचारीविरुद्ध शाब्दिक आसूड ओढले. स्वातंत्र्य मिळाले तरी सुराज्य निर्माण करण्यासाठी त्याग, निष्ठा, औदार्य व संयमी असा खंबीरपणा आणि आत्मविश्वास असलेली तरुण पिढी तयार व्हावी यासाठी त्यांनी समृद्ध आशयासह कला व तंत्र या दोन्ही दृष्टिकोनातून उत्कृष्ट अशा चित्रपटांची निर्मिती केली. भालजींचे चित्रपट किंवा त्यांची निर्मिती संस्था म्हणजे कलाकार व तंत्रज्ञ घडवणारी एक मोठी कार्यशाळाच होती. तसेच त्यांचा संच म्हणजे कुटुंबच होते.

# १ मे आंतरराष्ट्रीय कामगार दिवस

राजकीय पुढारी आताही कामगारांच्या प्रती उदासीन;म्हणून कामगारां समोर प्रश्न आहे, "जाए तो जाए कहा" कामगारवर्ग हा भारताचाच नाही तर संपूर्ण"जगाचा आधारस्तंभ" आहे,परंतु तो दिवसेंदिवस ढासळतांना दिसत आहे.दरवर्षी १ मे हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय कामगार दिवस म्हणुन साजरा केल्या जातो.आज जगाचा विचार केला तर ८० टक्के लोक कामगारांमध्ये मोडतात यात अनेक क्षेत्रातील कामगार वर्ग दिसुन येतात.शेतीतील कामगार असो, कारखाण्यातील कामगार असो किंवा इतर कोणत्याही क्षेत्रातील कामगार असो त्याची अत्यंत दयनाअवस्था दिसून येते.आज विकसीत, विकसनशील,गरीब या संपूर्ण देशातील कामगारांवर जिवन-मरणाचा प्रश्न उद्भवत आहे. आज भारताचा विचार केला तर सध्याच्या परिस्थितीत लोकसंख्येच्या बाबतीत स्फोटक आकडा दिसून येतो.भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेल्याचे युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडच्या आकडेवारी नुसार दिसून येते. म्हणजेच चीनच्या लोकसंख्येपेक्षा २९ लाखाने जास्त असुन जगात प्रथम क्रमांकावर आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत सरकार व राजकीय पुढाऱ्यांनी कामगारांची सर्वोतोपरी मदत करण्याची नितांत गरज आहे. आपल्या देशाचा विचार केला तर मुठभर राजकीय पुढाऱ्यांजवळ अरबो-खरबो रूपयांची चल-अचल संपत्ती आहे ही संपत्ती राजकीय पुढाऱ्यांनी कामगारांच्या प्रती उपयोगात आणली तर एक मदतीचा हात समजल्या जाईल. कामगार जगाचा "शिल्पकार"मानल्या जातो. तर शेतकरी हा "अन्नदाता" मानल्या जातो.यांची भुमिका देशासाठी व जगासाठी महत्त्वाची असते. आज मंदिर-मज्जीद, कारखाने, सरकारी इमारती,ताजमहाल, गुरूद्वारा, बौद्ध विहार,कुतुबमिनार,संसद भवन, मोठ-मोठी गडकील्ले जे आपण पहात आहोत ते संपूर्ण कामगारांच्या मदतीने बनवीण्यात आले. परंतु आज "शिल्पकारचे" हाल-बेहाल होत असल्याचे दिसून येते.कामगार हा जगाचा मोठा "आधारस्तंभ" आहे. कामगार नाही तर काहीच नाही. हीबाब भारतासह जगाने लक्षात ठेवली पाहिजे. कामगारवर्गामध्ये अशा अनेक अडचणी दीसुन येतात की त्यांचा उदरनिर्वाह होने अत्यंत कठीण झाले आहे.आपण जर भारतातील ईपीएस-९५च्या दिड करोड निवृत्त पेंशन धारकांचा विचार केला तर त्यांना १००० ते ३००० रूपयांपर्यंत पेन्शन मिळत आहे.पेंशन वाढण्याच्या आशेने निवृत्त पेंशन धारक मोठ्या आशेने सरकारकडे पहात होते.परंतु केंद्र सरकारने त्यांच्या मागणीकडे पाठ फिरविल्याचे दिसून येते.अल्पशा पेंशनमध्ये त्यांचा उदरनिर्वाह व औषधोपचार होवु शकत नाही. त्यामुळे त्यांच्यापुढे आजही जिवन-मरनाचा प्रश्न उपस्थित आहे. असंघटीत कामगारांचा विचार केला तर त्यांची परीस्थिती आनखीनच कठीण व भयावह आहे. त्यामुळे भारतासह जगात आजच्या परिस्थितीत कामगारवर्ग अत्यंत दु:खी आणि चिंतेत दीसुन येतो. २०१९ ते २०२१ हे वर्ष संपुर्ण जगासाठी महामारीने जखडलेले वर्ष ठरले.आजही शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती आहेच त्याच्या दुप्पटीने कामगारांची गंभीर परिस्थिती दिसून येते.भारत हा शेतीप्रधान देश आहे त्याचप्रमाणे बहु लोकसंख्येचा देश आहे. कामगार वर्ग मेहनतीने देशाच्या विकासासाठी व इतर कामांसाठी हातभार लावतो परंतु त्या कामाचा मोबदला तुटपुंजा मिळतो. त्यामुळे आता समान कायदा, समान अधिकार समान संपत्ती, समान वेतन,समान पेंशन यावर विचार करण्याची वेळ आलेली आहे. एका कुटुंबाला रहाण्याकरीता कीती जागा असावी,एका कुटुंबाजवळ उदरनिर्वाह करण्याकरिता कीती संपत्ती असावी. यावर माननीय प्रधानमंत्री, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, सुप्रिमकोर्ट, हायकोर्ट यांना विचार करण्याची वेळ आली आहे. कारण ही दु:खदायीबाब आहे की ज्यांना आपण लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, समाजसेवक म्हणतो अशा आजि-माजि राजकीय पुढाऱ्यांच्या संपत्तीचा विचार केला तर यांच्याजवळ अरबो-खरबो रूपयांची संपत्ती दीसून येईल. म्हणजेच राजकीय पुढारी तुपाशी आणि कामगार उपाशी अशी परिस्थिती आज भारतात सर्वत्र दिसून येते.यामुळेच देशात महागाई, बेरोजगारी, शिक्षणाचा अवाढव्य खर्च, आरोग्य सुविधा इत्यादीसह अनेक ज्वलंत समस्यांनी जन्म घेतला आहे.राजकिय पुढारी नेहमी समान अधिकाराची भाषा करतात परंतु ही सर्व राजकीय खेळी असते ही बाब सर्वांनाच लक्षात आहे. त्यामुळे करोना काळात झालेले नुकसान व जगातील सध्याची युद्धजन्य परिस्थिती पहाता आणि पुढे येणारी समस्या पहाता समान अधिकार, समान वेतन, समान संपत्ती यावर चर्चा करून नवीन कायदा सरकारने अमलात आणायला हवा. तेव्हाच कामगारवर्ग व गरीब वर्गाला दीलासा मिळेल अन्यथा श्रीमंत हा श्रीमंत होत जाईल व गरीब हा गरीबीच्या खाईत गुदमरून मरेल.करीता गरीब वर्ग व कामगार वर्ग यांच्या प्रती गांभीर्य बाळगून सरकारने कडक नियमावली आखली पाहिजे. तेव्हाच कामगार वर्ग सुखाने जगेल व योग्य न्याय प्राप्त होईल. भारत सरकारने कामगार दिनाचे औचित्य साधून कामगारांच्या प्रती मोठे पाऊल उचलण्याची गरज आहे. देशातील दिड करोड ईपीएस-१९९५ पेंशन धारकांचा प्रश्न अजुनही रडखडलेला आहे. त्यावरसुध्दा भारत सरकारने गांभीर्याने विचार करून अंतिम निर्णय घ्यायला हवा. पेंशनधारकांची एकच मागणी आहे की कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व आरोग्य सुविधा मिळावी.एवढे कार्य सरकारने केले तर ईपीएस-९५ चा पेन्शन धारक धन्य होईल.परंतु सरकार व ईपीएफओ पळवाटा काढतांना दिसतात.सरकारने कामगारांच्या जखमेवर फुंकर घालावी. यालाच खरा कामगार दिवस समजल्या जाईल.कारण ज्या "देशाचा कामगार सुखी तो देश सुखी" हे ही तितकेच सत्य आहे.सध्याच्या परीस्थितीत कामगार चळवळी संपुष्टात आल्या आहेत.त्यामुळे सरकारच कामगारांचे सर्वेसर्वा आहेत.अशा परीस्थितीत सरकारनेच कामगारांच्या प्रती योग्य पाउले उचलुन दिलासा दिला पाहिजे. कारण भारतातीलच नाही तर संपूर्ण जगातील कामगार वर्ग अत्यंत संवेदनशील आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यकुशलतेचा मोबदला त्यांना मिळायलाच पाहिजे.कारण कामगार हा जगाचा "आधारस्तंभ"आहे.या आधारस्तंभाला टिकवुन ठेवण्याची जबाबदारी भारतासह संपूर्ण जगाची आहे.कामगारांच्या प्रती सहानुभूती,सहकार्याची भावना सरकारने व भांडवलशाही वर्गाने अंगीकारली पाहिजे. यातच खऱ्या अर्थाने कामगार दिवसाची प्रतीमा दिसून येईल.देशाचा राजकीय पुढारी कामगार दिनाच्या निमित्ताने कामगारांना योग्य न्याय देण्याचे वचन देत असेल व त्यांच्या प्रती आदर ठेवत असेल तरच याला खऱ्या अर्थाने कामगार दिवस समजल्या जाईल. जगातील बदलते हवामान पहाता कामगार दिनाचे औचित्य साधून भारतासह जगातील देशांनी या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून कामगार दिवस साजरा करावा.यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहील.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार. (माजि विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)मो.नं.९९२१६९०७७९,**

# आम्ही स्वतःच्या नव्हे तर देशाच्या हितासाठी लोकसभेच्या आखाड्यात

## बीड लोकसभेसाठी महाराष्ट्र विकास आघाडीचे चंद्रकांत हजारे एक विश्वासक चेहरा-अँड अण्णाराव पाटील

/बीड

आज राज्यात आणि देशात राजकीय परिस्थिती विदारक झालेली आहे.देशाचे संविधान आणि लोकशाही वाचवण्यासोबतच हा देश वाचवण्याची देखील नैतिक जबाबदारी आता आपल्यावर आली आहे. यामुळे कोणाचाही द्वेष न करता महा - राष्ट्र विकास आघाडी जाहीरनामा नव्हे तर एक उद्देशिका समोर ठेवून लोकसभेच्या निवडणूक रणांगणात उतरली आहे.आम्ही महाराष्ट्रात 15 ते 16 ठिकाणी उमेदवार उभे करणार असून आम्हाला सामान्य मतदारांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. वर्धा, बुलढाणा, परभणी, नगर, माढा, मुंबई, लातूर,नाशिक या ठिकाणी उमेदवार उभे केलेले असून बीड लोकसभेसाठी आम्ही चंद्रकांत हजारे या सामान्य चळवळीतील कार्यकर्त्याला संधी दिली आहे. ते नक्कीच बीडकरांचे आश्वासक म्हणून लोकसभेत जातील असा विश्वास पक्षाचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष अँड अण्णाराव पाटील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. बीड येथे मंगळवार दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता महा - राष्ट्र विकास आघाडीची राजकीय भूमिका सांगण्यासाठी संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष अँड अण्णाराव पाटील यांची पत्रकार परिषद संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर




बीड लोकसभेचे उमेदवार चंद्रकांत हजारे यांच्यासह अँड अनिरुद्ध येचाळे, निखिल भातांब्रेकर, राजाभाऊ सुळ यांची प्रमुख उपस्थिती होती. पत्रकार परिषदेत अधिक माहिती देताना अण्णाराव पाटील म्हणाले, महाराष्ट्र विकास आघाडीची स्थापना राष्ट्रीय पातळीवर 2009 मध्ये करण्यात आली. आम्ही यावेळी देशातील, राज्यातील राजकीय अस्थिर परिस्थिती लक्षात घेता या देशाला, देशातील संविधानाला आणि आदर्श लोकशाहीला वाचवण्यासाठी लोकसभा निवडणूक लढवण्याचा निर्धार केला. आमचा पक्ष नवीन आणि सामान्य परंतु स्वाभिमानी जनतेचा आहे.आमच्याकडे धनसंपत्ती नाही. मात्र या देशाला वाचवण्याची, लोकशाहीला टिकवण्याची आणि संविधानाला संवर्धन करणारी विचारांची प्रगल्भता आमच्याकडे आहे. हेच सकारात्मक विचार घेऊन आम्ही मतदारांमध्ये जागृती करत आहोत. आम्ही प्रामुख्याने देव,धर्म, जात, पंथ, प्रांत, भाषा, लिंगभेद विरहित राजकारण असा नारा दिला आहे. या सोबतच राष्ट्रीयत्वाला प्राधान्य, कर्जमुक्त भारत, भ्रष्टाचार मुक्त भारत, वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणारा निर्णय, मोफत आणि दर्जेदार ते ही एकसमान शिक्षण, तरुणाच्या हाताला कामासह उद्योग, व्यापार आणि नंतर नोकरी, नद्याजोड प्रकल्पाची अंमलबजावणी, शेत मालासाठी किफायतशीर दर देण्याचा निर्धार असून सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकप्रतिनिधींचे भत्ते पेन्शन कायमचे बंद तरच देशातील विकास कामावर लक्ष देता येईल असा आमचा विश्वास आहे,तसेच मंदिर,मज्जित,गुरुद्वार, विहार यांच्यासाठी होणारा शासकीय खर्च कपात करणे, उपेक्षित वंचित विस्थापितांसाठी सत्ता असा नारा देत आम्ही लोकसभा निवडणुकीच्या विकास यात्रेत सहभागी झालो आहोत. आज देशात राज्यात एकही राजकीय पक्ष विश्वासाला पात्र नसल्याने आम्ही कुणासोबतही युती, महाआघाडी न करता स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतल्यामुळेच बीड लोकसभेसाठी आम्ही सामान्य कुटुंबातील चळवळीतील प्रामाणिक कार्यकर्त्या मधून घडलेला सामान्य नेता चंद्रकांत हजारे यांना उमेदवारी दिली आहे. त्यांना बीड जिल्ह्यातून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याने लोकसभेच्या सभागृहात ते बीडकरांचे एक आश्वासक चेहरा म्हणून जातील असा विश्वास अँड अण्णाराव पाटील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

### प्रस्थापित, धनाड्यांना बाजूला ठेवून यावेळी मतदार माझ्या विजयाची शिट्टी वाजवणार - चंद्रकांत हजारे

बीड जिल्ह्याने मातब्बर लोकप्रतिनिधी राज्याच्या आणि देशाच्या राजकारणासाठी दिले. मात्र या राज्यकर्त्यांनी बीड जिल्ह्याचा विकास न करता स्वतःचा विकास केला. त्यामुळे आजही ऊसतोड मजुरांचा मागास जिल्हा म्हणून बीड जिल्ह्याची ओळख आहे. हे या जिल्ह्याचे खरे दुर्दैव आहे. आज सत्तेसाठी विरोधक असलेले बहिण भाऊ एकत्र आले आहेत.शेतकऱ्यांच्या हिताचा कारखाना त्यांनी देशोधडीला लावला आहे. कुठल्याही विकासाचे प्रकल्प जिल्ह्यात राबवले गेले नाहीत अशा उमेदवारांना जनता नाकारेल तर दुसरे उमेदवार एक नव्हे दोन कारखान्याचे मालक आहेत. त्यांचे राजकीय चारित्र्य जनतेने पाहिलेले आहे.शेतकरी पुत्र म्हणणारे एवढ्या झटपट करोडपती कसे झाले हे जनतेला कळून चुकलेले आहे. त्यामुळे २०२४ मध्ये बीडकरांनी भाकरी फिरवण्याचा निर्णय पक्का केला असून प्रस्थापित आणि धनदांडग्यांना बाजूला ठेवून माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला बीड लोकसभा निवडणुकीत विजयी करतील आणि महा - राष्ट्र विकास आघाडीच्या विचारांना स्वीकारून विजयाची शिट्टी स्वीकारून ती मतपेटीतून वाजवतील असा विश्वास बीड लोकसभेचे महा - राष्ट्र विकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत हजारे यांनी व्यक्त केला.

# आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास निदर्शनास आणून द्यावे : निवडणूक निरीक्षक अजीमूल हक

**बीड / परळी**

बीड दि. 30 : आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहन बीड मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक अजीमूल हक यांनी मंगळवारी चिन्ह वाटपाच्या समयी राजकीय पक्षांना केले. राजकीय पक्षांची चिन्ह वाटपाची बैठक तसेच राजकीय पक्षांनी यापुढे घ्यावयाची काळजी या संदर्भातील सूचनांची माहिती देण्याकरिता जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे आणि निवडणूक निरीक्षक अजीमूल हक यांच्या प्रमुख उपस्थितीत बोलविण्यात आली होती. त्यावेळी श्री हक यांनी ही माहिती दिली. यांनी सांगितले सायंकाळी 5 ते 6 या वेळेत शासकीय विश्रामगृह येथे राहणार असून माझ्याशी थेट संपर्क करता येईल. यावेळी त्यांनी त्यांचा संपर्क क्रमांक 9404592511 राजकीय पक्षांना दिला आहे. निवडणूकीच्या काळात प्रत्येक घरावर एका पक्षाचे तीन अथवा तीन पक्षाचे एक-एक ध्वज लावता येतील. गाड्यांवर बॅनर लावता येणार नाही. स्टिकर लावण्यास हरकत नाही. मात्र पुर्वपरवानगी शिवाय लावू नये. निवडणूक काळात आदर्श आचारसंहिताचे पालन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून त्याला सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिलेली आहे. श्री हक यांनी काही मुद्दे आवर्जून सांगितले यामध्ये कोणत्याही पक्षाने तात्पुरत्या स्वरूपात सुरू केलेल्या संपर्क कार्यालयाबाबतची माहिती निवडणूक विभागास द्यावी. संबंधित कार्यालय हे मतदान केंद्राच्या 200



मीटरच्या परिसरात नसावे. तसेच कुठल्याही खाजगी अथवा शासकीय रुग्णालयाच्या शेजारी नसावे. ध्वनी प्रदूषण होणार नाही याची काळजी राजकीय पक्षांनी घ्यावी. प्रचार प्रसार करताना संरक्षण विभागातील कुठलाही शस्त्रसामुग्री अथवा सैनिकी चिन्हाचा वापर करू नये. प्रचारामध्ये बालकांचा उपयोग होणार नाही याची दक्षता घ्यावी. बाल कामगारांच्या कायद्याच्या विरोधात असल्याचे सांगितले. भारत शासनाने प्लास्टिक बंदी केली असून प्लास्टिकचा वापर प्रचारादरम्यान करू नये. सीव्हीजीएल ॲप चा वापर करून आचारसंहितेचा भंग झाल्यास निदर्शनास आणून द्यावे हा ॲप सर्वांसाठी उपयोगी असून 100 मिनिटाच्या आत ॲप वर तक्रार केल्यास कारवाई करण्यात येते. नागरिकांच्या मूलभूत अधिकाऱ्यांना प्रचारादरम्यान हनन होणार नाही, याची दक्षता घ्यावी. अशा मौलिक सूचना श्री हक यांनी यावेळी दिल्या.

# वनविभागातील आधिका-यांचा कारभार म्हणजे कुंपनच शेत खातंय; जिल्हाधिका-यांना तक्रार:- डॉ.गणेश ढवळे

बीड:- संपूर्ण मराठवाड्यात बीड जिल्ह्यात २.४ इतके कमी वनक्षेत्र असुन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित आहे.वनक्षेत्र कमी असल्याने बीड जिल्ह्यात वारंवार दुष्काळाचे संकट येत आहे.वनक्षेत्र आणि हरितक्षेत्र वाढविण्यासाठी बीड जिल्ह्यातील वनविभाग ठोस पाऊल उचलण्याऐवजी वृक्षलागवडीत भ्रष्टाचार तसेच वृक्षतोडीमुळे जिल्ह्याचे वाळवंट होत असताना वनविभागातील आधिका-यांची कारवाईस टाळाटाळ आणि अनाधिकृत सा मिलकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष यामुळे बीड जिल्ह्यातील वनविभागाचा कारभार म्हणजे कुंपनच शेत खातंय अशी परिस्थिती असुन बीड जिल्ह्यातील वनविभागातील १०कोटी ८४ लाख रुपये गैरव्यवहार, अनाधिकृत वृक्षतोड आणि अनाधिकृत सा -मिल प्रकरणात कारवाईस टाळाटाळ तसेच वनविभागातील गैरव्यवहार प्रकरणात वनसंरक्षक सामाजिक वनीकरण औरंगाबाद अमितकुमार मिश्रा यांनी दोन वेळा स्मरणपत्र पाठवुन देखील चौकशी करून अहवाल देण्यास टाळाटाळ केल्याबद्दल विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) बीड, विभागीय वन (सामाजिक वनीकरण) बीड तसेच जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांच्यावर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे,शेख युनुस,शेख मुबीन,शेख मुस्ताक यांनी जिल्हाधिकारी दिपा मुधोळ - मुंडे यांच्या मार्फत कार्यासिन अधिकारी महसूल व वनविभाग मंत्रालय, प्रधान मुख्य वनसंरक्षक



कार्यालय नागपुर, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) छत्रपती संभाजीनगर यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

वनविभागातील १० कोटी ८४ लाख रुपये गैरव्यवहार प्रकरणात वनसंरक्षक सामाजिक वनीकरण औरंगाबाद यांच्या आदेशाची अवमानना

\- - - -

बीड जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०१९-२० आणि सन २०२०-२१ वनविभागाच्या विविध कामांसाठी दिलेल्या १० कोटी ८४ लाख रुपये कामात गैरव्यवहार प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या तक्रारीनंतर वनसंरक्षक सामाजिक वनीकरण औरंगाबाद यांनी विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) बीड आणि वन अधिकारी (सामाजिक) वनीकरण बीड यांना संबंधित प्रकरणात चौकशी करून कार्यवाही करून तक्रारदारास परस्पर कळवुन कार्यालयास अहवाल सादर करावा असा आदेश देत दोन वेळा स्मरणपत्र देऊन सुद्धा अद्याप कोणतीही चौकशी व कारवाई न केल्याबद्दल संबंधित प्रकरणात जबाबदार आधिका-यांवर कारवाई करण्यात यावी.

अनाधिकृत सा-मिल प्रकरणात कारवाईस टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा

\- - - - - -

बीड जिल्ह्यात परवानाधारक सा मिलची संख्या व कार्यरत सा मिलची संख्या यात मोठी तफावत असुन अनाधिकृत सामिल वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे अर्थपूर्ण व्यवहारातुन कारवाईस टाळाटाळ होत असुन संबंधित प्रकरणात जबाबदार अधिका-यांची चौकशी करून कारवाई करण्यात यावी.

बीड जिल्ह्यातील वृक्षतोडीकडे हफ्तेखोरीमुळे कारवाईस टाळाटाळ बीड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी वृक्षतोडीच्या मोठ्या प्रमाणावर घटना घडत असुन वनविभागाकडे लेखी तक्रारी दिल्यानंतर सुद्धा कारवाई करण्यात येत नाही.बीड तालुक्यातील कानडीघाट गावातील अनाधिकृत वृक्षतोड प्रकरणात वनविभागातील अधिकारी यांनी स्थळपंचनामा केला मात्र संबंधित प्रकरणात गुन्हे दाखल करण्यास जाणिवपूर्वक टाळाटाळ केली जात आहे.यापुर्वीही वृक्षतोड करणारी गाडी वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी पकडल्यानंतर ती सोडण्यासाठी लाच घेताना सगळे पथकच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे संबंधित प्रकरणात कठोर कारवाई करण्यात यावी.

## श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी घेतली मतदार जागृतीची शपथ...





प्रतिनिधी दिनांक ३०/०४/२०२४ येथील भा शि. प्र. संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात निवडणूक साक्षरता कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवमतदार युवक -युवती तसेच सर्व नागरिकांत मतदान करण्याबाबत जागृती व्हावी या दृष्टीने मतदारांना मतदानासाठी प्रेरित करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी व मतदारांनी निर्भयपणे मतदान करून कुठल्याही भूलथापांना बळी पडणार नसल्याची शपथ दिली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना, उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये, प्रा. संतोष लिंबकर यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. कमलकिशोर लड्ढा, डॉ. रमेश गटकळ, डॉ. जिजाराम बागल यांनी प्रत्येक वर्गात जावून “ मतदान हे अनमोल दान आहे हे ‘मतदारांसाठीच्या प्रतिज्ञेद्वारे सांगितले. सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर च्या द्वारे सर्व महाविद्यालयात विद्यापीठ परीक्षा ह्या अंतिम टप्प्यात आहेत.त्यानुसार परीक्षा सुरु होण्याच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी भयमुक्त मतदान करून लोकशाही बळकट करण्यासाठी अवाहन सर्वांना करण्यात आहे.

या अगोदर महाविद्यालयात मतदार जागृतीसाठी काही उपक्रम वर्षभरामध्ये राबविण्यात आले. यामध्ये स्वाक्षरी मोहीम, मतदार जागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. नव मतदारांची नोंदणी देखील तहसील कार्यालय माजलगाव यांच्या वतीने करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी निवडणूक प्रक्रियेमध्ये या अगोदर सहभाग नोंदवून वृद्ध, दिव्यांग यांना मतदान करण्यासाठी मदत केली. हे सर्व कार्यक्रम महाविद्यालयातील निवडणूक साक्षरता कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पार पडले.

# प्राध्यापकांनी आपल्या ज्ञानाचा सदुपयोग विद्यार्थ्यांसाठी करावा - डॉ. हेमंत वैद्य

**माजलगाव/प्रतिनिधीदिनांक ०१/०५/२०२४**

प्राध्यापकांनी आपल्या ज्ञानाचा सदुपयोग विद्यार्थ्यांसाठी करावा असे प्रतिपादन भा.शि. प्र.संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव येथे आयोजित वर्षांत बैठकीत ते बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, सध्याच्या युगात शिक्षणाची अवस्था ढासाळत चालली आहे याला शिक्षक व विद्यार्थी दोघेही तितकेच जबाबदार आहेत अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. या दोघांचा समन्वय असल्याशिवाय शिक्षण प्रक्रिया नीट चालणार नाही. जसं संप्रेषण प्रक्रियेमध्ये श्रोता आणि वक्ता या दोघांना महत्व असते तसेच शिक्षण प्रक्रियेमध्ये देखील शिक्षक आणि विद्यार्थी हे दोन्ही घटक तितकेच जबाबदार असतात या दोघांच्या समन्वयानुसारच शिक्षण प्रक्रिया सुलभ होईल असे ते म्हणाले.

या बैठकीस प्रमुख उपस्थितीमध्ये स्थानिक संकुलाचे कार्यवाह एडवोकेट विश्वास जोशी हे देखील उपस्थित होते ते म्हणाले की अहवालाचे वाचन करण्यापेक्षा अहवालाचे संशोधन होणे अत्याधिक गरजेचे आहे. आपण केलेल्या कार्याचा सदुपयोग हा विद्यार्थी व समाजासाठी झाला पाहिजे. कारण समाजामध्ये आता फक्त शिक्षकांवरच समाजाचा प्रचंड विश्वास आहे आणि त्या विश्वासाला आपण तडा जाऊ दिला नाही पाहिजे. सतत विद्यार्थ्यांसाठी काम करत राहणे हीच शिक्षकाची ओळख आहे असे ते म्हणाले.

महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड म्हणाले की आपली शिक्षण संस्था ही ध्येय व विचारांनी प्रेरित झालेली संस्था आहे. केल्याने होत आहे रे। आधी केलेंची पाहिजे।। या वचनाप्रमाणे सर्व शिक्षक व कार्यकर्त्यांनी संस्थेमध्ये सतत काम करत राहिले तर तरच संस्थेची ओळख मोठी होईल व त्यानुसारच आपलेही नाव उज्वल होईल म्हणून सर्वांनी सतत मेहनत करणे गरजेचे आहे असे ते म्हणाले.




या बैठकीचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी केले. त्यावेळी त्यांनी संपूर्ण शैक्षणिक कार्याचा आढावा संस्थेसमोर मांडला. याप्रसंगी त्यांनी नॅक प्रक्रियेमध्ये सर्व प्राध्यापकांच्या जीवावर घवघवीत यश संपादन करू संपादन करू अशी आशा व्यक्त केली. एकता, अनुशासन व विकास ही त्रिसूत्री कोणत्याही संस्थेच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन ही त्यांनी केले.

या बैठकीची सुरुवात अभिनव पद्धतीने करण्यात आली . वर्षभरामध्ये केलेल्या कार्याचा आढावा अभिनव पद्धतीने शिक्षक व संस्था पदाधिकारी यांच्यासमोर स्लाईड शोच्या माध्यमातून सादर करण्यात आला.

या बैठकीमध्ये कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संतोष लिंबकर यांनी कनिष्ठ विभागाचा अहवाल सादर केला. अध्ययन अध्यापन व अभ्यासपूरक उपक्रम या विभागाचा अहवाल डॉ.गंगाधर उषमवार, अभ्यासेत्तर उपक्रम व विद्यार्थी विकास मंडळ याचा अहवाल डॉ. तात्याराम सोंडगे, अंतर्गत मूल्यमापन विभागाचा अहवाल डॉ.कमलकिशोर लड्ढा, संशोधन विभागाचा अहवाल डॉ. सिताराम इंगोले, विस्तार व सेवा कार्य विभागाचा अहवाल प्रा. अशोक होके, अंतर्गत गुणवत्ता व हमी कक्ष याचा अहवाल डॉ. विनायक देशमुख, बलोपासक मंडळाचा अहवाल डॉ. उमेश साडेगावकर, कलोपासक मंडळाचा अहवाल डॉ. रमेश गटकळ, ज्ञानोपासक मंडळ व विवेक ग्राम याचा अहवाल डॉ. ज्ञानेश्वर गवते, कार्यालय विभागाचा अहवाल श्री. उत्तरेश्वर आनेवार यांनी मांडला. या बैठकीचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये यांनी केले तर आभार उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना यांनी मानले. याप्रसंगी जिल्हा स्वीप नोडल अधिकारी छत्रपती संभाजी नगर यांच्याकडून प्राप्त झालेली निर्भयपणे मतदान करण्याविषयीची शपथ सर्व शिक्षक कार्यकर्त्यांना देण्यात आली.या बैठकीस महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ



लाईफ कॉम्प्युटर्स
सेल्स अँण्ड सर्व्हिसेस
कॉम्प्युटर । लॅपटॉप । प्रिंटर । रिफर्ब लॅपटॉप

9404800081 / 7020240121
www.lifecomputerbeed.com"
बी.एस.एन.एल.ऑफिस च्या बाजुला,डी.पी.रोड, बस स्टॅन्ड्या मागे,बीड

# होय, मी भटकती आत्मा, जनतेसाठी शंभर वेळा: शरद पवार यांचं मोदींना सडेतोड उत्तर ?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांच्यावर जोरदार टीका केली होती. शरद पवार हे भटकती आत्मा असून त्यांनी राज्य अस्थिर ठेवल्याचा आरोप मोदी यांनी केला होता. मोदी यांच्या या आरोपाला शरद पवार यांनी सडेतोड उत्तर दिलं आहे. होय, मी भटकती आत्मा आहे. जनतेसाठी मी शंभरवेळा अस्वस्थ राहील, असं प्रत्युत्तर शरद पवार यांनी दिलं. शिरुरमध्ये अमोल कोल्हे यांच्या प्रचारसभेत बोलताना शरद पवार यांनी हे सडेतोड उत्तर दिलं.ईडीचा मी एक टक्काही वापर करत नाही, असं पंतप्रधान काल म्हणाले होते. जनतेचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना तुम्ही तुरुंगात टाकता. आता तुम्ही एक टक्का म्हणा की आणखी काही म्हणा. तुम्ही हुकूमशाहीच्या दिशेने जात आहात. माझ्या बोटाला धरून राजकारणात आलेले, आता माझ्याबद्दल काय बोलतात? एक आत्मा भटकत आहे असं तुम्ही म्हणाला. त्या आत्म्यापासून सुटका व्हायला हवी, अस मोदी म्हणाले. पण हा अस्वस्थ आत्मा स्वत:साठी नाही. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी, महागाईतून जनतेची सुटका करण्यासाठी आहे. यासाठी मी शंभरवेळा अस्वस्थता दाखवेन. हे संस्कार यशवंतराव चव्हाणांचे आहेत, त्यात आम्ही तडजोड करणार नाही, असं शरद पवार यांनी ठासून सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधी यांच्यावरही टीका केली होती. या टीकेचाही शरद पवार यांनी समाचार घेतला. राहुल गांधींवर टीका करतात. साहबजादे क्या करेंगे? मोदींना कायतरी वाटायला हवं. राहुलच्या तीन पिढ्या देशासाठी झटल्या आहेत. देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी झटले आहेत. गरिबी हटविण्यासाठी इंदिरा गांधींची हत्या झाली. आधुनिकेतवर देश पुढं जावा, यासाठी लढा उभारणाऱ्या राजीव गांधींची हत्या झाली. वडील आणि आज्जींनी देशासाठी बलिदान दिलं. त्या राहुल गांधींना म्हणतात साहबजादे काय करणार? कन्याकुमारी ते



काश्मीरपर्यंत भारत जोडो यात्रा काढली, जनतेचे प्रश्न जाणून घेतले. पण याबाबत बोलण्याऐवजी मोदी काहीही बोलत आहेत. खोट्या गोष्टी सांगत, चुकीच्या पद्धतीने टीका टिप्पणी करत आहेत. त्यामुळे अशा लोकांच्या हातातून सत्ता काढून घेणं गरजेचं आहे, असं शरद पवार म्हणाले. सत्तेचा दुरुपयोग केला जातोयजे चांगले काम करतात, ते सत्तेचा दुरूपयोग करतात. मुळात सत्ता ही जनहिताच्या कामासाठी करायची असते, याचा विसर सत्ताधाऱ्यांना पडला आहे. जनतेला अडचणीतून दूर करण्यासाठी सत्तेचा वापर करायचा असतो, इथं अडचणीत आणण्यासाठी सत्तेचा गैरवापर केला जातोय, असा हल्लाबोल पवार यांनी केला.ते आयुष्यभर विसरणार नाही यावेळी शरद पवार यांनी एक किस्सा सांगितला. 1960 साली मी पुण्यात शिक्षण घेत होतो. यशवंतराव चव्हाण साहेबांबद्दल प्रचंड आदर होता. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू होती. हे मराठी राज्य व्हावं यासाठी प्रचंड संघर्ष झाला. त्यावेळी पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी महाराष्ट्र राज्याची घोषणा केली. तो दिवस होता 1 मे 1960. त्यावेळी आम्ही विद्यार्थी होतो, या चळवळीत आम्ही मोठ्या संख्येने सहभागी झालो होतो. त्यावेळी यशवंतराव चव्हाण शिवनेरीवर येऊन घोषणा करतील आणि मग पंतप्रधान मुंबईमध्ये अधिकृत घोषणा करतील, असं ठरलं होतं. ही बातमी आम्हाला समजताच, आम्ही सगळे शिवनेरीवर आलो. आयुष्यात पहिल्यांदा मी शिवनेरीवर आलो होतो. त्यावेळी प्रथमतः यशवंतराव चव्हाणांना आम्हाला पाहता आलं. हे आम्ही आयुष्यभर विसरू शकत नाही. पुढं याचं महाराष्ट्राचे नेतृत्व करायला मिळालं. साल होतं 1967. त्यापुढं मी 14 वेळा निवडणुका लढल्या आणि त्या जिंकल्या. जनतेचं दुखणं मांडण्याची संधी मला जनतेने दिली, असं त्यांनी सांगितलं.

# माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण कक्षाने सतर्कतेने काम पहावे : निवडणूक निरीक्षक अजिमुल हक



बीड, दि.30: (जिमाका) माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती तथा मीडिया कक्षाने निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अधिक सतर्कतेने काम करावे, अशा सूचना निवडणूक निरीक्षक अजिमुल हक यांनी कक्षाला भेटीदरम्यान दिल्या. आज दुपारी श्री हक यांनी अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ठिकाणी निवडणुकी संदर्भातील विविध कक्षांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी एमसीएमसी व मीडिया कक्षालाही भेट दिली. त्यावेळी त्यांनी कक्षाच्या कामकाजाचा आढावा घेतला. तसेच याप्रसंगी काही सूचना केल्या.

मंगळवारी राजकीय पक्षांना चिन्ह वाटपाची प्रक्रिया पूर्ण झाली असून आता प्रचाराला सुरुवात होणार असल्याने एमसीएमसी कक्षाने अधिक सतर्क राहून काम करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. बीड मतदारसंघात प्रकाशित होणारे हिंदी, इंग्रजी, मराठी तसेच उर्दू वर्तमान पत्रात प्रकाशित होणाऱ्या पेड न्यूज बातम्यांवर करडी नजर ठेवावी. तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमात येणाऱ्या पेड न्यूजवरही नजर ठेवावी. यासह नवीन माध्यमे जसे व्हाट्सअप, इन्स्टाग्राम, फेसबुक, युट्युब आदी माध्यमातून येणाऱ्या पेड न्यूज बातम्यांवरही नजर ठेवण्याची सूचना त्यांनी केली. राजकीय पक्षाकडून येणाऱ्या मुद्रित माध्यमांसाठी तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठीच्या जाहिरातीचे प्रमाणीकरण करताना आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही याची काटेकोरपणे काळजी घ्यावी, अशा महत्त्वपूर्ण सूचना त्यांनी यावेळी दिल्या. एमसीएमसी सदस्य सचिव तथा मीडिया कक्षाच्या प्रमुख अंजू निमसरकर यांनी श्री हक यांना आतापर्यंत केलेल्या कामांच्या माहितीचा गोषवारा सांगितला. यावेळी कक्षाचे काम पाहणारे अन्य सहकारी राजश्री आचार्य, प्रतिभा खाडे, रेवती लाबडे, छाया जिरे, लता करांडे या उपस्थित होत्या. 0000



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार माधव काळे तसेच हर्षद कांबळे उपस्थित होते.

# महिला क्रिकेट पटू पूनम राऊत यांच्या हस्ते १४ वर्षाखालील मुला / मुलींचे अहमदनगर प्रीमियर लीग स्पर्धेचे पारितोषिक वितरण

संतोष औताडे- अहमदनगर प्रतिनिधी

सविस्तर माहिती - दिनांक 28/04/2024 रोजी गेल्या दहा दिवसापासून चालू असलेल्या अहमदनगर प्रीमियर लीग स्पर्धेचे पारितोषिक वितरण भारताच्या माजी महिला क्रिकेट पटू पूनम राऊत यांच्या हस्ते गुलमोहर रोड येथील डिफेन्स स्पोर्ट्स अकॅडेमी च्या मैदानावर पार पडले. या वेळी त्यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले त्यांनी सरावाचे महत्व,जिद्द, अपयश कसे पाचवावे,मानसिक कणखरता, क्षेत्ररक्षण आदीचे महत्व नमूद केले, अकॅडेमी च्या सुविधा, टर्फ विकेट, इनडोअर स्टेडियम, प्रॅक्टिस विकेट, मैदानावर असलेली हिरवळ याचे ही कोतुक केले. सगळ्या मुला / मुली सोबत गप्पंगोष्टी केल्या व भविष्यात नगर मधून चांगले खेळाडू निर्माण होतील अशी खात्री दिली. आजचा अंतिम सामना कार्तिक रॉयल्स विरुद्ध दीपक स्ट्राईकर यांच्यात झाला. या मध्ये कार्तिक रॉयल संघाने दीपक स्ट्राईकर संघाचा 7 गडी राखून पराभव केला, प्रथम फलंदाजी करताना दीपक स्ट्रायकर संघाने 8 गडाच्या मोबदल्यात 122 धावा निर्धारित 20 षटकामध्ये केल्या. त्यात सार्थक दौंड याने सर्वाधिक 70 धावांचे योगदान दिले.तरी सय्यद अम्मार याने 17 धावां केल्या. कार्तिक रॉयल संघाकडून शोर्या जठार याने 2 बळी मिळविले. कार्तिक रॉयल ने प्रतिउत्तर देताना16.1




षटकात 3 गडाच्या मोबदळ्यात 123 धावा केल्या. या मध्ये सर्वाधिक 57 धावा राम खोमणे यांनी केल्या.तर विराज जोशी याने नाबाद 27 धावा केल्या. सार्थक दौंड याने 2 बळी मिळविले. अंतिम सामन्याचा सामनावीर राम खोमणे ची निवड झाली. स्पर्धेमधील बेस्ट बॅटर - विराज जोशी 209 धावा गोलंदाज - कुमारी मानिनी वायाळ 11 बळी क्षेत्ररक्षक - समर्थ शेंडगे विकेट किपर - समर्थ कोठवलं मॅन ऑफ द सिरीस - सार्थक दौंड या प्रसंगी वरिष्ठ क्रिकेटपटू श्री गोविंद मिसाळ यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. तसेच या प्रसंगी स्पर्धेचे प्रयोजक श्री राजेंद्र चौधरी, राजीव चिटगोपिकर, सौं पल्लवी घोडके, अंबादास बेरड, अमोल घोलप, सम्राट देशमुख, विशाल बुऱ्हाडे,गोकुळ दौंड तसेच माजी क्रिकेट पटू प्रवीण अंतेपोलू, शशिकांत निऱ्हाली, कोच अतुल ठाकूर हजर होते. स्पर्धाचे यशस्वी साठी प्रशांत अंतेपोलू, विजय बरकासे, रामकिसन शिंदे, प्रतीक पवार, कुणाल अंतपोलू, हर्षल अंतपोलू, चंद्रकांत मेंगाळ, अभिषेक चिकणे, हर्षवर्धन बोर्डे, साहिल खान, सर्वाय कराळे, सुजल बत्तीन, अनुराग दत्ता, अथर्व गर्जे आदींनी परिश्रम घेतले. या वेळी आभार प्रदर्शन अकॅडेमी चे संचालक संदीप घोडके यांनी आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com